RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—ब

वर्ष ३, अंक ६३(२)] शुक्रवार मे २६, २०१७/ज्येष्ठ ५, शके १९३९ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक १३८**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**वित्त विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २६ मे २०१७

**अधिसूचना**

**महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२.**

क्रमांक मूवक. १५१७/प्र.क्र.५७/कराधान-१.— महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ (२००५ चा महा. ९) च्या कलम ४२ च्या उप-कलम (३क) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे, शासन अधिसूचना, वित्त विभाग क्रमांक मूवक. १५१०/प्र.क्र. ६५/कराधान-१, दिनांक ९ जुलै २०१० मध्ये दिनांक १ जून २०१७ पासून खालील सुधारणा करीत आहे, म्हणजेच :—

(१) उक्त अधिसूचनेच्या प्रस्तावनेमध्ये, "करारानुसार त्यांना ते हस्तांतरित करीत असेल" या शब्दांऐवजी "करारानुसार किंवा अन्यथा त्यांना ते हस्तांतरित करीत असेल किंवा हस्तांतरित करण्याचे मान्य करीत असेल" हे शब्द दाखल करण्यात येत आहेत ;

(२) उक्त अधिसूचनेला जोडलेल्या अनुसूची ऐवजी खालील अनुसूची दाखल करण्यात येत आहे, म्हणजेच :—

**अनुसूची**

| व्यापाऱ्यांचा वर्ग<br>(१) | आपसमेळाची रक्कम<br>(२) | अटी<br>(३) |
|---|---|---|
| नोंदणीकृत व्यापारी, जो सदनिका, निवासस्थाने किंवा इमारती किंवा जागा यांचे बांधकाम करण्याचे काम हाती घेत असेल व जमिनीच्या किंवा तलस्थित जमिनीच्या हितसंबंधीत व्यक्तीबरोबर केलेल्या करारानुसार किंवा कराराशिवाय त्यांना ते हस्तांतरित करीत असेल किंवा हस्तांतरित करण्याचे मान्य करीत असेल आणि जेथे वरील करारनाम्याची, | सदनिका, निवासस्थाने किंवा इमारती किंवा जागा यांच्या संबंधात प्राप्त झालेल्या प्रदानाच्या (आगाऊ रक्कम म्हणून असो किंवा इतर कारणाने असो) एक टक्का. | (१) स्तंभ (१) च्या खंड (क) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या व्यापाऱ्याने,—<br>(क) स्तंभ (२) नुसार रकमेचा भरणा जर उक्त प्रदान दिनांक ३१ मे २०१७ रोजी किंवा त्यापूर्वी प्राप्त झाले असेल तर दिनांक ३० जून २०१७ रोजी किंवा त्यापूर्वी करावा ; |

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| (क) नोंदणी ३१ मे २०१७ रोजी किंवा त्यापूर्वी केलेली नसेल; किंवा,<br>(ख) नोंदणी १ जून २०१७ रोजी किंवा तद्नंतर केलेली असेल किंवा नसेल. | | (ख) अशा प्राप्त प्रदानाचा समावेश विक्रीच्या उलाढालीमध्ये याबाबतच्या नियमांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या नियतकालिकेनुसार जून २०१७ च्या कालावधीसाठीच्या मासिक किंवा, यथास्थिती जून २०१७ रोजी संपणाऱ्या तिमाहीसाठीच्या त्रैमासिक विवरणात करावा.<br>(२) स्तंभ (१) च्या खंड (ख) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या व्यापाऱ्याने,—<br>(क) स्तंभ (२) नुसार रकमेचा भरणा जर उक्त प्रदान प्राप्त झालेल्या महिन्याच्या लगतच्या पुढील महिन्याच्या २१ तारखेस किंवा त्यापूर्वी करावा ;<br>(ख) अशा प्राप्त प्रदानाचा समावेश विक्रीच्या उलाढालीमध्ये जर नियतकालिका मासिक असेल तर मासिक विवरणामध्ये, किंवा, यथास्थिती याबाबत केलेल्या नियमामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या नियतकालिकाप्रमाणे करावा.<br>(३) दावेदार व्यापाऱ्याने या योजनेचा स्वीकार आपसमेळ भरण्यासाठी केला असेल तर तो खरेदी-बाबतच्या वजावटीच्या दाव्यास पात्र राहणार नाही.<br>(४) दावेदार व्यापारी आपसमेळ योजना स्वीकारलेल्या कार्य कंत्राटासाठी, परराज्यातून केंद्रीय विक्रीकर अधिनियम, १९५६ अन्वये नमुना-सी प्रतिज्ञापन वापरुन खरेदी केलेला माल हस्तांतरित करणार नाही.<br>(५) दावेदार व्यापारी ज्या कार्यकंत्राटासाठी आपसमेळ स्वीकारलेला असेल त्यासाठी नमुना ४०९ मधील प्रतिज्ञापन त्याच्या उप-कंत्राटदाराला देणार नाही.<br>(६) दावेदार व्यापारी त्याने स्वीकारलेल्या या आपसमेळ योजनेखाली कंत्राटाबाबत कर देयता गणनेची पध्दती बदलू शकणार नाही.<br>(७) दावेदार व्यापारी कर बिजक देणार नाही. |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रा. द. भगत,**
शासनाचे उप सचिव.

## FINANCE DEPARTMENT

Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated the 26th May 2017

*NOTIFICATION*

MAHARASHTRA VALUE ADDED TAX ACT, 2002.

No. VAT. 1517/C.R.57/Taxation-1.— In exercise of the powers conferred by sub-section *(3A)* of section 42 of the Maharashtra Value Added Tax Act, 2002 (Mah. IX of 2005), the Government of Maharashtra hereby amends, with effect from the 1st June 2017, the Government Notification Finance Department No. VAT 1510/CR-65/Taxation-1, dated the 9th July 2010, as follows, namely :—

In the said notification,—

(*1*) in the preamble, for the words "transfer them in pursuance of an agreement" the words "transfer or agrees to tranfer them in pursuance of an agreement or otherwise" shall be substituted ;

(*2*) for the Schedule appended to the said notification, the following Schedule shall be substituted, namely :—

*Schedule*

| Class of dealer (1) | Composition amount (2) | Conditions (3) |
|---|---|---|
| A registered dealer who under takes the construction of flats, dwelling or building or premises and agrees to transfer them in pursuance of an agreement or otherwise, along with land or interest underlying the land and where the aforesaid agreement,– (*a*) has not been registered on or before the 31st May 2017 ; or, (*b*) is registered or not, on or after 1st June 2017. | One *per cent*. of the payment received in respect of the flats, dwelling or building or premises (whether as advance or otherwise). | (1) The dealer specified in column (1), clause (*a*) shall,– (*a*) pay an amount as per column (2) on or before the 30th June 2017, if the said payment is received on or before the 31st May 2017 ; (*b*) include such payment received as turnover of sales in the monthly return for the period of June 2017 or, as the case may be, for the quarter ending June 2017, as per the periodicity specified in the rule made in this behalf. (2) The dealer specified in column (1), clause (*b*) shall,— (*a*) pay an amount as per column (2), on or before the 21st day of the immidiately succeeding month in which the said payment is received; (*b*) include such payment received as turnover of sales in the monthly return if |

| (1) | (2) | (3) |
| --- | --- | --- |
| | | periodicity for filling return is monthly or, as the case may be, the periodicity specified in the rule made in this behalf.<br>(3) The claimant dealer opting to pay composition amount under this scheme shall not be eligible to claim set-off of taxes paid in respect of the purchases.<br>(4) The claimant dealer shall not transfer the property in goods, procured from outside the State, using the declaration in Form C under the Central Sales Tax Act, 1956 in the contract for which he has opted to pay composition amount in lieu of tax payable under the Act.<br>(5) The claimant dealer shall not issue declaration in Form 409 to his sub-contractor in respect of the works contract for which composition is opted.<br>(6) The claimant dealer shall not be entitled to change the method of computation of tax liability in respect of contract for which he has opted for this composition scheme.<br>(7) The claimant dealer shall not issue Tax Invoice. |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

R. D. BHAGAT
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.